# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./२९४४ /२०२० दि.२२ /१०/२०२०

## परिपत्रक

**विषय:- सेवानिवृत्त शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना तात्पुरते सेवानिवृत्ती वेतन सुरू करण्याबाबत.**

संदर्भ:- मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/निवेदन/संकीर्ण/३९/२०२० विशि/६६५७ दिनांक १२ ऑक्टों, २०२०

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयीन प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व संबंधितांना संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयामध्ये अनुदानित पदावरून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना काही कारणास्तव नियमित सेवानिवृत्ती वेतन सुरू करण्याबाबत अडचणी येत असतील, अशा प्रकरणी सेवानिवृत्ती वेतन देण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम १२६ व १३० मधील तरतूदीनुसार तात्पुरते सेवानिवृत्ती वेतन मंजूर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी असे संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

त्यानुसार संलग्नित सर्व महाविद्यालयातील ज्या प्रकरणी नियमित निवृत्तीवेतन सुरू करण्यास अडचणी असतील अशा प्रकरणी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना तात्पुरते सेवानिवृत्ती वेतन सुरू करण्याबाबतची उचित कार्यवाही आपल्या स्तरावरून घेण्यात यावी.

(डॉ. ईश्वर श्री. मोहुर्ले)
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

सहपत्र:- संदर्भिय पत्र
**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरू यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये,
४. सर्व विभाग प्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ..........
जावक 10393 17/10/2020

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 4689 दि. 17/10/2020
जावक क्र. ......... दि. .........

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
www.dhepune.gov.in E-mail- vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६१२४६३९,२६०५१५१२ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्रमांक- युएनआय/निवेदन/संकीर्ण/३९/२०२०/विशि /6657 दिनांक- 12 OCT 2020

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य.

**विषय- सेवानिवृत्त शिक्षकेत्तर कर्मचा-यांना तात्पुरते सेवानिवृत्ती वेतन सुरु करणेबाबत.**

संदर्भ- १.संचालनालयाचे पत्र क्रमांक युएनआय (७४/१९)/अधी.३/विशि-१/४७८७
दिनांक ७ ऑगस्ट, २०१९ व दिनांक २० जुलै, २०२०
२.शासनपत्र क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१६१/२०/विशि-१
दिनांक २९.०९.२०२०

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयामध्ये अनुदानित पदावरुन सेवानिवृत्त कर्मचा-यांना काही कारणास्तव नियमित सेवानिवृत्ती वेतन सुरु करण्याबाबत अडचणी येत असतील, अशा प्रकरणी तात्पुरते सेवानिवृत्ती वेतन देण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम १२६ व १३० मधील तरतूदीनुसार तात्पुरते सेवानिवृत्ती वेतन मंजूर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी असे संदर्भिय क्रमांक १ अन्वये कळविलेले आहे

तसेच मा.मंत्री महोदय यांची संघटनेच्या प्रतिनिधीसमवेत प्रलंबित प्रश्नांबाबत बैठक दिनांक २८ सप्टेंबर, २०२० रोजी आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीचे इतिवृत्त शासन पत्र दिनांक २९ सप्टेंबर, २०२० अन्वये प्राप्त झालेले असून या इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे सेवानिवृत्त कर्मचा-यांना तात्पुरते सेवानिवृत्ती वेतन सुरु करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील ज्या प्रकरणी नियमित निवृत्तीवेतन सुरु करण्यास अडचणी असतील अशा प्रकरणी शिक्षकेत्तर कर्मचा-यांना तात्पुरते सेवानिवृत्ती वेतन सुरु करण्याबाबतची उचित कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- माहितीस्तव सादर
१. स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.३२
२. स्वीय सहाय्यक, मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.३२
३.मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२